महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर | मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ २३ फेब्रुवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २३९ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# गतीने होणार वाहनांचं स्क्रॅपिंग

## रोड टॅक्समध्ये व नवीन वाहन खरेदीत मिळणार सवलत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : कोणत्याही वाहनाची खरेदी केल्यावर त्याचा वाहतुकीसाठी वापर केला जातो. मात्र, त्या वाहनाचा वापर थांबल्यानंतर त्याला निष्कसित करणं गरजेचं आहे. मात्र विवध कारणांमुळे त्याचे निष्कसन होत नाही. अनेकदा खासगी केंद्रांच्या माध्यमातून वाहनाचं निष्कासन केलं जातं. मात्र, रजिस्टर्ड व्हेईकल स्क्रॅपिंग फॅसिलिटी (आर.व्ही.एस.एफ) च्या माध्यमातून वाहनाचं निष्कासन केल्यास वाहन धारकाला नवीन वाहन खरेदी करताना करामध्ये 10 टक्के सूट देण्यात येणार आहे. राज्यात सध्या नागपूरमध्ये 2, जालनामध्ये 1 आणि पुण्यात 4 अशी एकूण सात आर.व्ही.एस.एफ केंद्रं आहेत. तर, लवकरच आणखी 6 केंद्रं सुरू करण्यात येणार आहेत. परिवहन विभागानं त्यासाठी मंजुरी दिली आहे.



**नवीन वाहन घेताना मिळणार दहा टक्के सूट :**

जुनं वाहन निष्कासन करण्याकडं अनेकांचा कल नसतो. मात्र, जुनं वाहन आर.व्ही.एस.एफच्या माध्यमातून निष्कासन केल्यास संबंधित वाहन मालकाला नवीन वाहन नोंदणीवेळी करामध्ये दहा टक्के सूट देण्यात येईल, असा निर्णय परिवहन विभागानं घेतला आहे. त्याचा लाभ वाहन चालकांनी घ्यावा, असं आवाहन परिवहन विभागातर्फे करण्यात आलं आहे. केंद्र सरकारनं मोटर वाहन आणि नोंदणी नियम 2021 अंमलात आणला आहे. त्यामध्ये जुन्या वाहनांच्या बदल्यात नवीन वाहन वापरलं जावं अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. यामुळं प्रदूषणामध्ये घट होईल, वाहनांची इंधन क्षमता सुधारणे, प्रवासी आणि वाहनांचा सुरक्षिततेत वाढ होणे असे विविध लाभ होतील. अशा विविध कारणांसाठी जुन्या वाहनांना निष्कासित करण्याचं प्रमाण वाढण्यासाठी ही सूट देण्याचा निर्णय परिवहन विभागानं घेतला आहे.

**खासगी वाहनांसाठी काय आहे नियम? :**

सध्या खासगी वाहनांना पंधरा वर्षांपर्यंत कोणतंही फिटनेस सर्टिफिकेट द्यावं लागत नाही. मात्र, पंधरा वर्षानंतर वाहनाची फिटनेस तपासणी करून त्या फिटनेस प्रमाणपत्रावर त्यांना पुढील पाच वर्षांसाठी ग्रीन टॅक्स लावून वाहन चालवण्याची परवानगी देण्यात येते. म्हणजे पंधरा वर्षांनंतर दर पाच वर्षांनी फिटनेस प्रमाणपत्र घेणं त्यांच्यासाठी बंधनकारक आहे. तर, व्यावसायिक वाहनांसाठी आठ वर्षांपर्यंत दर दोन वर्षांनी फिटनेस सर्टिफिकेट घ्यावं लागतं. आठ वर्षानंतर वाहन चालवण्यासाठी दरवर्षी त्या वाहनांचं फिटनेस प्रमाणपत्र परिवहन विभागाकडं जमा करणं अनिवार्य आहे.

**10 टक्के कर सवलतीचा लाभ कुणाला?**

खासगी वाहन असल्यास नोंदणी केल्यापासून 15 वर्षांच्या आत वाहन निष्कासन करणाऱ्यांना आणि व्यावसायिक वाहन असल्यास नोंदणी केल्यापासून 8 वर्षांच्या आत वाहन निष्कासन करणाऱ्यांना ही सूट दिली जाणार आहे. तुमचं खासगी वाहन 15 वर्षांनंतर आणि व्यावसायिक वाहन 8 वर्षांनंतर निष्कासन केल्यास ही सूट मिळणार नाही. यातील महत्त्वाची बाब ही आहे की, सदर वाहन कोणत्याही खासगी स्क्रॅप करणाऱ्या केंद्रात स्क्रॅप न करता ते वाहन सरकारमान्य आर. व्ही. एस. एफ. केंद्रातूनच स्क्रॅप करणं आवश्यक आहे, तरच करामध्ये सूट मिळेल, अन्यथा मिळणार नाही. संबंधित वाहन मालकानं नवीन वाहन खरेदी केल्यावर नोंदणी करताना त्यांना सदर केंद्रातून वाहन स्क्रॅप केल्याचं प्रमाणपत्र परिवहन विभागाला सादर करावं लागेल. त्यानंतर 10 टक्के रक्कम वजा करुन उर्वरित कर भरुन घेतला जाईल. सरकारी वाहनांना १५ वर्षानंतर सेवेतून बाहेर काढून निष्कासन करणं बंधनकारक करण्यात आलं आहे.

## थोडक्यात महत्वाचे

### रायते ब्रिजवरून क्रेन नदीपत्रात कोसळले कठडयाचे मोठे नुकसान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : कल्याण- मुरबाड राष्टीय महामार्गवरील रायते ब्रिज वरून शुक्रवारी रात्रीच्या सुमारास भला मोठा क्रेन पुलावरून नदी पात्रात कोसळला आहे. पुलाचे कठडे तुटलेअसुन मोठे नुकसान झाले आहे. कुठलीही जीवितहानी झाली नसुन,कठडे तुटल्याने पुन्हा अपघात होण्याची शक्यता आहे हे कठडे लवकरात लवकर बसविन्याची मागणी राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष राम सुरोशी, श्रीकांत तारमले, सिलास सोनावले यांनी केली आहे.

## मुंबईचे तापमान ३७ अंशावर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/मुंबई : ऋतुबदलाच्या काळात सध्या किमान आणि कमाल तापमानाचा पारा वाढत असून मुंबईचा पारा सलग दुसऱ्या दिवशी ३७ अंशांपार पोहोचला. सांताक्रूझ येथे शनिवारी ३७.२ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान, पुढील काही दिवस तापमान चढेच राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मुंबईत शनिवारी सांताक्रूझ येथे ३७.२ अंश सेल्सिअस, तर कुलाबा येथे ३५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ येथील तापमान सरासरीपेक्षा ५.२ अंशांनी अधिक नोंदले गेले. मात्र, याआधी फेब्रुवारीमध्ये कमाल तापमानाचा पारा ३८ अंश सेल्सिअसपारही पोहोचला आहे . सांताक्रूझ येथे २०२३ मध्ये ३७.९ तर २०२० मध्ये ३८.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती. दिवसभर उकाडा आणि दुपारी उन्हाचा चटका यामुळे दुपारी घराबाहेर फिरणाऱ्या मुंबईकरांना शनिवारी वातावरणातील बदलांचा अधिक त्रास सहन करावा लागला. कमाल तापमानाबरोबरच किमान तापमानातही मागील दोन दिवसांपासून वाढ होत आहे. यामुळे पहाटेचा जाणवणारा गारवा आता नाहीसा झाला आहे.दरम्यान, सध्या सायंकाळनंतर उत्तरेकडून थंड वारे वाहत आहेत. तर दिवसा पूर्वेकडून वारे येत असल्यामुळे तापमानाचा पारा चढा राहील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. मुंबईबरोबरच रत्नागिरी, ठाणे या भागातही तापमानाचा पारा चढा होता. रत्नागिरी येथे ३८.४ अंश सेल्सिअस, तर ठाणे येथे ३७ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

# यंदा १ एप्रिलपासून शैक्षणिक वर्ष

## शालेय शिक्षण राज्यमंत्री भोयर यांची माहिती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी यंदापासूनच (2025-26) करण्यासाठी शिक्षण विभाग प्रयत्नशील आहे. या निर्णयाबाबत शाळांमध्ये कुठलाही संभ्रम नाही. याकरिता सर्व शिक्षणाधिकारी, उपसंचालक यांनी जिल्हा, तालुकास्तरावर योग्य समन्वय ठेवून काम सुरू केले असल्याची माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) येथे आयोजित आढावा बैठकीआधी माध्यमांशी ते बोलत होते. भोयर म्हणाले, शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याकरिता शिक्षण विभागाने सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रमात बदल केले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीने केंद्रीय शिक्षण मंडळाचा अर्थात सीबीएसईचा अभ्यासक्रम स्विकारण्याची सूचना केली होती. त्यानूसार सीबीएसई बोर्ड न घेता फक्त थोडयाफार प्रमाणात अभ्यासक्रम स्विकारण्यात आला आहे. यावर्षी पहिलीची पुस्तके सीबीएसईच्या अभ्यासक्रमानूसार उपलब्ध करून दिली जाणार आहे. टप्पाटप्याने बदल केले जाणार असल्याचे भोयर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षणाबरोबरच त्यांच्या आवडीच्या क्षेत्राचे प्रशिक्षण घेता यावे यासाठी इयत्ता 9 वी ते 12 च्या विद्यार्थ्यांसाठी आनंद निवासी गुरूकुल या संकल्पनेनूसार शाळा सुरू केल्या जाणार आहेत. कला, क्रीडा, शारिरिक शिक्षण, संगीत अशा क्षेत्रांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे. राज्यातील आठ विभागात प्रत्येकी एक याप्रमाणे ही शाळा सुरू करण्यात येणार आहे. या क्षेत्राची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांची छाननी करून त्यांना प्रवेश दिले जाईल. राज्यात पाच ठिकाणी विद्यानिकेतन शाळा असून त्याचे रुपांतर आनंद निवासी गुरूकुल करण्यात येईल. तर उर्वरित तीन ठिकाणी नव्याने सुरू करण्यात येईल. यासाठी सरकारकडून शिक्षक पुरविले जाणार आहे. ज्यांची ईच्छा आहे त्यांच्याकडून अर्ज मागविण्यात येईल. त्यांनत अर्जाची छाननी करुन विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार असल्याचे भोयर यांनी सांगितले. आरटीईतून दिले जाणाऱ्या शिक्षणाचा गोरगरीब विद्यार्थ्यांना फायदा होत असतो. शाळांना शुल्क परतावा वेळेत मिळत नसल्याने त्यांचे नूकसान होते. या परिस्थितीवर सरकारकडून कायमस्वरूपी तोडगा काढण्यात येईल. पूर्व प्राथमिक शिक्षणावर सरकारचा अंकुश असला पाहिजे. यासाठीचा कायदा तयार करण्याचे काम सुरू आहे. बदलापूर येथील शाळेत घडलेल्या लैगिंक अत्याचाराच्या घटनेचा अहवाल तपासून योग्य ती कारवाई करण्याचा इशारा भोयर यांनी दिला. पीएमश्रीच्या धर्तीवर सीएमश्री शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून शाळा भेट उपक्रम राबविला जात आहे. या माध्यमातून शाळांची गुणवत्ता तपासली जात आहे. राज्यात काही पीएमश्री शाळांच्या धर्तीवर सीएमश्री शाळा सुरू केल्या जाणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी या शाळा सुरू करण्याबाबत अनुकुलता दर्शविली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा यामध्ये प्रामुख्याने समावेश असेल, असे भोयर यांनी सांगितले.

# खडवली,नडगाव मध्ये चाळ माफियांचा हैदोस



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण-कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील ६५ बेकायदा बांधकामांचा प्रश्न चर्चेत असताना खडवली, नडगाव परिसरात बेकायदा चाळी उभारल्या जात आहे. त्याकडे पोलिस, वनखाते, ग्रामपंचायत, तहसीलदार, पंचायत समितीचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. खडवली सह हा परिसर बेकायदा बांधकामांचा हॉट स्पॉट होत असल्याचे बोलले जात आहे. खडवली हा परिसर महापालिका हद्दीत येत नाही. खडवली येथील बेकायदा बांधकाम प्रकरणी एक याचिका दाखल होती. उच्च न्यायालयाने अशी अनधिकृत बांधकामे झाल्यास महसूल, वन विभाग, पोलिस आणि पंचायत समितीला बाबदार धरले जाईल असे सूचित केले होते. मात्र खाजगी जागेवर तर अनधिकृत बांधकामे करुन चाळी उभारल्या जात आहेत. याच चाळीतील बेकायदा घरे सामान्य नागरीकांना स्वस्तात विकून त्यांची आर्थिक फसवणूक केली जात आहे. ही फसवणूक रोखण्यासाठी या बेकायदा बांधकामावर कारवाई केली गेली पाहिजे अशी मागणी या भागातील नागरीकांकडून केली जात आहे.

# मतदार संघातील सर्वच गरजू गरीबांना घरकुल मिळवून देणार

## - आ किसन कथोरे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्या सह मुरबाड विधानसभा मतदारसंघातील सर्वच समाज घटकातील गरजू गरीब कुटूबाना निवाऱ्यांसाठी घरकुल योजनेचा लाभ मिळवून देणार असल्याची ग्वाही आमदार किसन कथोरे यांनी दिली. मुरबाड तालुक्यातील प्राप्त लाभार्थीना घरकुल मंजुरी चे पत्र देताना दिली. मुरबाड तालुक्यात दहा हजार 290 घरकुले विविध योजने आंतर्गत मंजूर कलरण्यात आली आहेत. तसेच कल्याण तालुक्यात 2 हजार 530 व अंबरनाथ तालुक्यात 1900 अशी घरकुले मंजूर करण्यात आलेली आहेत. यावेळी आमदार किसन कथोरे यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना करत या घरकुलांची कामे दर्जेदार पणे करून घ्यावीत. कुठे ही गैरप्रकार दिसल्यास त्याबाबत कडक कारवाई करणार असल्याचे सांगत मुरबाड विधानसभा मतदार संघात रमाई, शबरी, पंतप्रधान मोदी आवास योजना, व अन्य योजनेतील सर्वच घरकुलांचा लाभ सर्व प्राप्त लाभार्थीना मिळावा यासाठी अधिकाऱ्यांनी सर्व्हे करून माहिती द्यावी असे ही सांगितले.

# उल्हासनगरात भुयारी गटारीची कामे



## रस्ते खोदल्याने ठेकेदारांना नोटिसा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : उल्हासनगर महापालिका क्षेत्रात ४२६ कोटीच्या निधीतून सुरु असलेल्या भुयारी गटारीचे काम ३५ टक्के होऊन ९७ कोटी बिल ठेकेदाराला अदा करण्यात आले. भुयारी गटार व पाणी पुरावठा वितरण योजनेचे काम पूर्ण होण्यासाठी एका वर्षा पेक्षा जास्त कालावधी लागणार असल्याने, रस्ते खोदण्याचे काम सुरु राहणार आहे. उल्हासनगर महापालिका हद्दीत गेल्या दोन वर्षांपासून ४२६ कोटीच्या निधीतून भुयारी गटारी योजना, ११० कोटीच्या निधीतून पाणी पुरावठा वितरण योजनेचा दुसरा टप्पा, १५० कोटीच्या निधीतून एमएमआरडीए अंतर्गत एकूण मुख्य ७रस्त्याचे काम सुरु आहेत. याव्यतिरिक्त महापालिका निधी व राज्य शासनाच्या विशेष सुख सुविधा निधीतून विविध विकास कामे सुरु असून या कामासाठी रस्ते खोदण्यात येत आहेत. खोदलेल्या रस्त्यामुळे शहरांत माती व धुळीचे साम्राज्य निर्माण होईन वाहतूक कोंडीची समस्या उभी ठाकली. तसेच धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. आयुक्तानी विकास कामाची पाहणी केली असून मुदत संपलेल्या अर्धवट कामाच्या ठेकेदारांना नोटीसा काढल्या आहेत. महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या आक्रमक भूमिकेमुळे ठेकेदारांचे धाबे दणाणले आहे. तर अधिकाऱ्यांना ई-प्रणालीनुसार गेल्या काही वर्षाच्या कामाचा अहवाल पाठविण्याचे आदेश दिल्याने, त्यांच्यातही नाराजी पसरली आहे. डम्पिंग ग्राऊंड, डीप क्लिनींगचे आयोजन, महापालिका कारभार डिजिटल आदी कामामुळे आयुक्त आव्हाळे प्रकाश झोतात आल्या असून राज्य शासनकडे शासन नियुक्ती अधिकाऱ्याची मागणी केली आहे.

# स्वच्छता कामांचे जिओ टॅग अहवाल सादर करा

## भिवंडी पालिका आयुक्त अनमोल सागर यांचे प्रशासनाला निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ भिवंडी:

भिवंडी पालिका आयुक्त अनमोल सागर यांचे प्रशासनाला निर्देश

ठाणे : भिवंडी शहरासाठी तयार करण्यात आलेल्या शंभर दिवसांच्या कृती आराखडा अंतर्गत प्रभागनिहाय दैनदिन विशेष स्वच्छता मोहिम राबविण्याबरोबरच छोट्या गटारांच्या दैनदिन सफाईसाठी मोहिम राबवून त्या कामाचे जिओ टॅग छायाचित्रे आणि अहवाल सादर करण्याचे निर्देश पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी आरोग्य व स्वच्छता विभागाच्या आढावा बैठकीत दिले. सार्वजनिक शौचालयांच्या सफाईबरोबरच बाजारपेठ परिसर तसेच जास्त कचरा जमा होणाऱ्या ठिकाणी रात्रीच्या वेळेतही साफ सफाई सुरू ठेवण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. भिवंडी महापालिकेचे नवनियुक्त आयुक्त तथा



प्रशासक अनमोल सागर यांनी पालिकेचा कारभार हाती घेतल्यानंतर विविध विभागांची बैठक घेण्यास सुरूवात केली असून यामध्ये संबंधित विभागाच्या कामांचा आढावा घेण्याबरोबरच त्यात सुधारणा करण्यासाठी आयुक्त सागर हे महत्वाच्या सुचना करीत आहेत. अशाचप्रकारे त्यांनी आरोग्य व स्वच्छता विभागाची नुकतीच बैठक घेतली. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त देविदास पवार, उप-आयुक्त (आरोग्य) शैलेश दोंदे, सहा-आयुक्त (आरोग्य) नितिन पाटील, आरोग्य अधिकारी हरीष भंडारी, कार्यलयीन अधिक्षक जे.एम. सोनवणे तसेच सर्व प्रभाग आरोग्य निरीक्षक उपस्थित होते. या बैठकीत त्यांनी शहरातील सार्वजनिक स्वच्छता, दैनदिन गटार सफाई, जास्त वर्दळीच्या ठिकाणी दिवसातून दोन वेळा स्वच्छता करणे, सामुदायिक आणि सार्वजनिक शौचालयांची विशेष स्वच्छता करणे, या कामांना प्रथम प्राधान्य देऊन नागरीकांच्या तक्रारी तातडीने निवारण करण्याचे सक्त निर्देश आरोग्य व स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. बाजारपेठ परिसर तसेच जास्त कचरा जमा होणाऱ्या ठिकाणी रात्रीच्या वेळेतही साफ सफाई सुरू ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सुरक्षा साधन सामुग्रीसह गणवेशात सर्व सफाई कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. शहरातील जास्तीत जास्त नागरीकांना वैयक्तिक शौचालय योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्रभाग निहाय घरांचे सर्वेक्षण करुन वैयक्तिक शौचालय योजनेची जनजागृती करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. शहरातील झोपडपट्टी क्षेत्रात कचरा संकलनासाठी मोठे कचरा डबे ठेवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. भिवंडी शहरासाठी १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्या अंतर्गत प्रभागनिहाय दैनदिन विशेष स्वच्छता मोहिम, छोट्या गटारांच्या दैनदिन सफाईकरीता धडक मोहिम राबवून त्याचे जिओ टॅग छायाचित्र आणि अहवाल सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. तसेच दर आठवड्यात कामाचा आढावा सादर करणे बंधनकारक केले आहे, अशी माहिती पालिकेचे माहिती व जनसंपर्क अधिकारी श्रीकांत परदेशी यांनी दिली.

# गीतासार



यज्ञशिष्टाशिनः सन्तो मुच्यन्ते सर्वकिल्बिषैः । भुञ्जते ते त्वघं पापा ये पचन्त्यात्मकारणात् ॥ ३-१३ ॥

यज्ञ करून शिल्लक राहिलेले अन्न खाणारे श्रेष्ठ मनुष्य सर्व पापांपासून मुक्त होतात. पण जे पापी लोक केवळ स्वतःच्या शरीरपोषणासाठी अन्न शिजवितात, ते तर पापच खातात. ॥ ३-१३ ॥

अन्नाद्भवन्ति भूतानि पर्जन्यादन्नसम्भवः । यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ ३-१४ ॥ कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् । तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ ३-१५ ॥

सर्व प्राणी अन्नापासून उत्पन्न होतात. अन्ननिर्मिती पावसापासून होते. पाऊस यज्ञामुळे पडतो. आणि यज्ञ विहित कर्मांमुळे घडतो. कर्मसमुदाय वेदांपासून व वेद अविनाशी परमात्म्यापासून उत्पन्न झालेले आहेत, असे समज. यावरून हेच सिद्ध होते की, सर्वव्यापी परम अक्षर परमात्मा नेहमीच यज्ञात प्रतिष्ठित असतो. ॥ ३-१४, ३-१५ ॥

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः । अघायुरिन्द्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ ३-१६ ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), जो मनुष्य या जगात अशा प्रकारे परंपरेने चालू असलेल्या सृष्टिचक्राला अनुसरून वागत नाही म्हणजेच आपल्या कर्तव्याचे पालन करीत नाही, तो इंद्रियांच्या द्वारे भोगांत रमणारा पापी आयुष्य असलेला मनुष्य व्यर्थच जगतो. ॥ ३-१६ ॥

# डॉ गणेश पाटील यांना 'खानदेश समाज रत्न पुरस्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : गेल्या २४ वर्षापासून उल्हासनगर आणि आसपासच्या उपनगरांमध्ये रक्त तपासणी तथा अॅक्युपंचरच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा पुरवणाऱ्या डॉ गणेश पंडित पाटील यांना नुकतेच माजी मंत्री एकनाथ खडसे यांच्या उपस्थितीत खानदेश समाज रत्न पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. यावेळी समाजातील अनेक प्रतिष्ठित आणि यशस्वी व्यक्तित्वांचाही समावेश होता. जळगाव मधील तालुका रावेर येथील सन्मित्र युवा फाऊंडेशनच्या माध्यमातून डी जे

देशमुख माध्यमिक विद्यालयात आयोजित समाजाचा ११ वा वधू वर सूचक मेळावा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित डॉ गणेश पाटील यांचा यथोचित सन्मान झाला.

याच प्रसंगी आणखी काही समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाज रत्नांचाही सन्मान करण्यात आला. या समाजाच्या सहवासात मी वाढलो त्या समाजाचे मी देणं लागतो आणि त्या भावनेतून माझी ही वैद्यकीय सेवा सुरू असते. आणि सुरूच राहणार असे सत्कारा ला उत्तर देताना डॉ. गणेश पाटील म्हणाले.

तर, यावेळी समाजाला संबोधित करताना एकनाथ खडसे म्हणाले की, नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने समाज महाराष्ट्र नव्हे , देश नव्हे, तर देशाच्या बाहेर देखील विखुरलेला आहे अशा सोहळ्यांच्या माध्यमातून त्यांचे एकत्रीकरण करणे हे गरजेचं असतं. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत बाऊस्कर, सुनील चौधरी, सुरेश पंढरीनाथ झोपे, यांच्यासह अनेक सत्कारमूर्ती उपस्थित होते.

# कर्मयोगी संत गाडगे बाबा



महाराष्ट्रातील थोर संत, किर्तनकार, समाजसुधारक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे खंदे समर्थक, स्वच्छतेचे पुढारक संत गाडगे महाराज यांची आज जयंती. संत गाडगे महाराज यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. त्यांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे झाला. ते त्यांच्या आईच्या माहेरी, मूर्तिजापूर तालुक्यातील दापुरे येथे लहानाचे मोठे झाले. त्यांच्या मामाची मोठी शेती होती. त्यांनाही शेतीची आवड होती विशेषतः गुरांची निगराणी करण्यास त्यांना खूप आवडे. १८९२ साली गाडगे महाराजांचे लग्न झाले. त्यांच्या मुलीच्या बारशाला त्यांनी गावकऱ्यांना गोडधोडाचे जेवण दिले त्याकाळच्या परंपरेला हा छेद होता कारण त्याकाळी कोणत्याही कार्यक्रमात गावकऱ्यांना दारू आणि मटण दिले जात, ही परंपरा त्यांनी मोडून काढली. लहानपणापासून अन्याय, अत्याचार, अंधश्रद्धा, कर्मठ रूढी परंपरा, कर्मकांड यावर त्यांनी कठोर प्रहार केले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घरदाराचा त्याग करुन संन्यास स्वीकारला. त्यांनी तीर्थाटन स्वीकारले. अनेक ठिकाणी भ्रमण केले. वनवासातही त्यांनी लोकसेवेचे व्रत सोडले नाही. कोठे कोणी अडचणीत सापडला असल्यास त्याला आपण होऊन मदत करायला धावायचे, मदत करून कोणत्याही फळाची अपेक्षा न धरता ते आपल्या वाटेने निघून जायचे. ते सतत एक खराटे जवळ बाळगत. अंगावर गोधडीवजा फाटके तुटके कपडे आणि एक फुटके गाडगे असा त्यांचा वेष असत त्यामुळेच लोक त्यांना गाडगेबाबा म्हणत. ते ज्या गावात जात ते गाव खराट्याने स्वछ करीत. सार्वजनिक स्वछता, अंधश्रद्धा निर्मूलन ही तत्वे समाजात रुजवण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, भोळया समजुती, अरिष्ट रूढी, परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले उभे आयुष्य वेचले. विवेकाच्या खराट्याने गावोगावी फिरुन त्यांनी लोकांची मने स्वच्छ केली त्यासाठी ते गोवोगावी जाऊन कीर्तने केली. आपल्या कीर्तनात ते श्रोत्यांनाच विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची, दुर्गुण व दोषांची जाणीव करुन देत. आपल्या कीर्तनातून ते लोकांना चोरी करू नका, ऋण काढून सण साजरे करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, व्यसनांच्या आहारी जाऊ नका, नवस करू नका, प्राण्यांची हत्या करू नका, मुक्या प्राण्यांवर दया करा, जातीभेद, अस्पृश्यता पाळू नका, मुलांना शाळेत पाठवा, आजारी माणसांना भगत, देवऋषी यांच्याकडे न नेता डॉक्टरांकडे न्या, आपले घर- गाव स्वच्छ ठेवा असे उपदेश ते करत. देव दगडात नसून माणसात आहे हे त्यांनी सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवले. आपले विचार भोळ्या भाबड्या लोकांना समजण्यासाठी ते वैदर्भीय ग्रामीण बोली भाषेचा उपयोग करीत. लक्षावधी रुपये खर्च करुन त्यांनी नाशिक, आळंदी, देहू, पंढरपूर या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा, गोशाळा, पाठशाळा, घाट, पाणपोया बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटीमोठी रुग्णालये बांधली, अतिशय गरीब, अनाथ व अपंग मुलांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली, कुष्ठरोग्यांचीही त्यांनी सेवा केली. संत गाडगे महाराज हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले संत होते. अंधश्रद्धा आणि कर्मकांडाची त्यांनी सतत टिंगल केली. धर्म आणि विज्ञानाची सांगड घालणारे संत हेच खरे समाजसुधारक होत. अध्यात्माला विज्ञानाच्या परिसावर घासण्याचा हितोपदेश गाडगे महाराजांनी केला. असे हे साध सरळ व संत परंपरेतील एक महान संत कर्मयोगी संत गाडगे महाराजांनी २० डिसेंबर १९५६ रोजी विदर्भाच्या भूमीत अखेरचा श्वास घेतला. आज त्यांची १४९ वि जयंती, त्यानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

- श्याम बसप्पा ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे

# डॉक्टर गौरवी यशवंतराव
## डॉक्टर ऑफ फिलोसॉफी पीएचडी पदवीने सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुका जसा वेगवेगळ्या उत्पादनामध्ये आघाडीवर आहे तसा तो शिक्षण क्षेत्रामध्ये ही गरुड भरारी घेत आहे दारे सदैव उघडी असल्याने विद्यार्थी वेगवेगळे क्षेत्रांमध्ये नावलौकिक करीत आहेत अशाच प्रकारे मुरबाड तालुक्यातील सरळगाव येथील आप्पा यशवंतराव यांची कन्या गौरवी यशवंतराव हिने वैद्यकीय क्षेत्रामध्ये मोठे प्राविण्य मिळवला असून मुंबईत झालेले का कार्यक्रमात डॉक्टर क्षेत्रातील पदवी मान्यवरांच्या उपस्थितीत बहाल करण्यात आली मुरबाड तालुक्यातील सरळगावचे सुपुत्र तथा शिवसेना मुरबाड तालुका समवयक




अप्पा यशवंतराव सध्या कल्याण येथे राहत आहेत त्यांची कन्या डॉ. गौरवी राजश्री भारत यशवंतराव २२ फेब्रुवारी २०२५ रोजी रसायन तंत्रज्ञान संस्था आयसीटी माटुंगा आयोजित कुलपती कुलगुरू आणि व्यवस्थापन मंडळाचे सदस्य यांच्याकडून डॉक्टर ऑफ फिलोसॉफी पीएचडी ही पदवी दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात आली आहे. यामुळे सर्वत्र गौरवी यशवंतराव हिचे अभिनंदन होत आहे.

सदर समारंभाचे प्रमुख पाहुणे सुखमल जैन संचालक भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड व पद्मभूषण प्राध्यापक जस्ट राज भालचंद्र जोशी कुलपती रसायन तंत्रज्ञान संस्था प्राध्यापक अनिरुद्ध पंडित कुलगुरू रसायन तंत्रज्ञान संस्था पद्मभूषण डॉक्टर अमित चेअरमन शिपला लिमिटेड मुंबई बशीर नादेड गोदरेज चेअरमन गोदरेज इंडस्ट्रीज ग्रुप मुंबई हे उपस्थित होते .

# ठाणे भारत स्काऊट गाईड कार्यालयात चिंतन दिन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दि.22 फेब्रुवारी हा दिवस स्काऊट गाईड चळवळीचे जनक लॉर्ड बेडन पॉवेल व लेडी बेडन पॉवेल यांच्या जन्मदिन संपूर्ण जगभरात चिंतन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. याचे औचित्य साधून ठाणे भारत स्काऊट गाईड जिल्हा कार्यालयात दि. २२ फेब्रुवारी २०२५ शनिवार रोजी लॉर्ड बेडन पॉवेल व लेडी बेडन पॉवेल यांच्या जन्मदिनानिमित्त प्रतिमा पूजन व प्रार्थनेने चिंतन दिन साजरा करण्यात आला. यावेळी लीडर ट्रेनर अल्मेडा मॅडम, लीडर ट्रेनर अलका पवार, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट केशव चौधरी, सहाय्यक आयुक्त रणजीत शिंदे, प्राचार्य अविनाश मालुंजकर, अर्जुन चेमटे, जिल्हा संघटक गाईड हेमांगी पाटील, नाईक विठ्ठल शिरोसे आदी मान्यवर कार्यालयात उपस्थित होते.

स्काऊट गाईड हि एक जागतिक शैक्षणिक चळवळ आहे. या चळवळीची स्थापना 1907 मध्ये झाली. स्काऊटिंग गाइडिंग हा एक खेळ आहे. जगातील 195 पेक्षा जास्त राष्ट्रातील चार कोटीहून अधिक स्काऊट गाईड चळवळीमध्ये प्रत्यक्ष शिक्षण घेत आहेत. तीन वर्षाच्या बालकापासून ते पंचवीस वर्षाच्या युवक युवतींकरीता संस्कारक्षम वयात त्यांच्यावर चांगले संस्कार घडावेत, ते उद्याचे आदर्श चरित्र्यसंपन्न नागरिक बनावे यासाठी राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, सांस्कृतिक आदान प्रदान, ऐतिहासिक व मूल्यनिष्ठ प्रणालीसाठी, सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी शिक्षण देण्यासाठी प्रयत्नशील असणारी व तिच्या मूलभूत तत्वावर आधारलेली एक वैशिष्ट्यपूर्ण चळवळ आहे. स्काऊट गाईड जवळ चारित्र्य, हस्तव्यवसाय, आरोग्य व सेवा या चार मूलभूत आधारस्तंभावर आधारलेली आहे. शालेय विद्यार्थ्यांमधील उपजत कला कौशल्य गुणांची जोपासना करून त्यांना छंदातून चरित्राकडे नेता यावे यासाठी स्काऊट गाईड अभ्यासक्रमाचे योजन करण्यात आले आहे. प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण व संघ पद्धती हे या अभ्यासक्रमाची गुरुकिल्ली आहे.

आरोग्य

# ताणतणावाचे व्यवस्थापन



नियमित ध्यान करा: नियमित सकाळ संध्याकाळ 20 ते 30 मिनिटं ध्यास साधना केल्यास तणावाचं व्यवस्थापण करता येवू शकते. कारण ध्यान केल्यास मनाला शांती मिळते. तणाव कमी होतो तसंच सकारात्मक भावना निर्माण होण्यास मदत होते. प्रथम 5 मिनिटांपासून ध्यास करण्यास सुरुवात करा हळूहळू हे वाढवून 30 मिनिटं ध्यान करण्याची सवय लावा.

व्यायाम: शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी नियमित व्यायाम करणे फायदेशीर आहे. व्यायाम केल्यास तुम्ही तंदुरुस्त राहता शिवाय चांगली झोप देखील येते. यामुळे हाडे मजबूत होतात. व्यायाम केल्यास वजन वाढीची समस्या देखील दूर करता येवू शकते.

वाचन करा: नियमित वाचन करणं चांगलं आहे. आवडत असलेल्या एखाद्या साहित्यापासून तुम्ही वाचनास सुरुवात करू शकता. यामुळे तणाव आणि चिंता दूर होण्यास मदत होते. मन प्रसन्न होतो शिवाय मनात सकारात्मक भावना निर्माण होण्यास मदत होते.

पुरेशी झोप: तणावाचं व्यवस्थापण करताना झोप महत्वाची भूमिका बजावते. चांगल्या आरोग्यासाठी नियमित किमान 7 ते 8 तास झोप घेणं गरजेचं आहे. पूर्ण झोप घेतल्यामुळे दिवसभर ताजतवाण वाटते. तसंच तणाव आणि चिंता कमी होते.

योग्य आहार: आहारात योग्य पोषक घटकांचा समावेश असणे गरजेचं आहे. कारण हे आपल्याला उर्जा प्रदान करतात यामुळे मन प्रसन्न राहते.

# मराठी तरुणांनी आवडीच्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम करावे

## मराठी पाऊल पडते पुढे या चर्चासत्रातील सूर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : मराठी तरुणांनी आपल्या आवडीच्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम केल्यास निश्चित यश मिळते, असा सूर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशीच्या पहिल्या सत्रातील मराठी पाऊल पडते पुढे या चर्चासत्रात उमटला.

नवी दिल्ली येथे आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसातील पहिल्या सत्रात "मराठी पाऊल पडते पुढे" या डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यासपीठावर आयोजित चर्चासत्रात बीव्हीजी समूहाचे हणमंतराव गायकवाड, ज्येष्ठ उद्योजक रवी पंडित, ज्येष्ठ पत्रकार पराग करंदीकर व वृत्त निवेदक प्रसन्ना जोशी सहभागी झाले होते.

श्री हणमंतराव गायकवाड म्हणाले, मराठी संस्कृती दहीहंडीसारखी असावी, एकमेकांना हातभार लावून पुढे नेणारी असावी. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आपल्याला काय काम करायचे आहे ते ठरविणे महत्त्वाचे आहे. प्रत्येकाची आनंदाची व्याख्या वेगवेगळी आहे, आपल्याला ज्या क्षेत्रात आनंद मिळतो तो मिळवावा असे सांगतानाच मला रोजगार, आरोग्य व शेतकरी बांधवांसाठी काम करण्यात आनंद आहे. असे काम करा असा सल्लाही त्यांनी दिला.

मराठी तरुणांनी आपले आवडते क्षेत्र निवडावे व त्या क्षेत्रात झोकून देऊन काम करावे, असे सांगून श्री गायकवाड म्हणाले, आपल्या देशाच्या प्रगतीसाठी देशातील शेतकऱ्यांची प्रगती अत्यंत महत्त्वाची आहे. गावातच सर्व सुविधा मिळतील अशा दृष्टीने नियोजनही महत्त्वाचे आहे. गावातच उत्पन्नाचे स्रोत कसे वाढविता येतील त्यासाठी काम करावे लागणार आहे. आपण दहा लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवून काम करत असल्याचेही श्री गायकवाड यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज व स्वामी विवेकानंद यांचा आदर्श समोर ठेवून आपण काम करत असल्याचे सांगून श्री. गायकवाड म्हणाले, बीव्हीजी समूहाचा आठ लोकांचा प्रवास आज एक लाख लोकांपर्यंत पोहोचला आहे. अमेरिकेतही बीव्हीजी ग्रुप काम करत असून जगभर बीव्हीजी ग्रुपच्या माध्यमातून काम विस्तारण्याचा आमचा प्रयत्न आहे. जगात खूप संधी आहेत संधीचा आपण शोध घेतला पाहिजे. कोणतेही काम लहान नाही. आपण निवडलेले काम समर्पित भावनेने करा, असे श्री गायकवाड म्हणाले. उद्योजक श्री. रवी पंडित म्हणाले, आपण आपल्या क्षेत्रात काम करताना ते काम चांगले असेल तर तेच काम आपली ओळख निर्माण करते. आपल्या वागण्या बोलण्यातून आपले व्यक्तिमत्व ठरते. आपण आपल्या क्षेत्रात ध्येयाने प्रेरित असाल तर लोकही मागे उभे राहतात. त्यासाठी आपला उद्देश चांगला पाहिजे. नवीन उद्योजक स्वतःच्या बळावर पुढे जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज यांचा आदर्श महत्त्वाचा आहे. आपल्या देशाला पुढे नेण्यासाठी प्रत्येकाला आपल्या क्षेत्रात समर्पित भावनेने काम करावे लागणार आहे. उल्लेख श्री पंडित यांनी यावेळी केला.

ज्येष्ठ पत्रकार श्री पराग करंदीकर म्हणाले, प्रत्येक क्षेत्रात मराठी पाऊल पुढे पडते आहे ही आनंदाची बाब आहे. आपल्याला प्रगतीसाठी सर्वसामावेशक व्हावे लागणार आहे. आपण ज्या क्षेत्रात काम करतो त्या क्षेत्रातील छोट्या-मोठ्या नोंदी आपल्याला ठेवाव्या लागणार आहेत. इतिहासाचे भान ठेवून वर्तमान कवेत घेऊन भविष्याचे नियोजन करावे लागणार आहे. वर्तमानाचा वेध घेताना भविष्याची बांधणी होऊ शकते असेही ते म्हणाले.

प्रत्येकाने आपले ध्येय साध्य करण्यासाठी सर्वतोपरी व प्रामाणिकपणे केलेले प्रयत्न महत्त्वाचे आहेत. आपल्याला वेळेचे नियोजन अत्यंत बारकाईने करावे लागणार आहे. प्रत्येक गोष्ट शिकण्याची वृत्ती बाळगावी यश निश्चित मिळेल असा विश्वास श्री करंदीकर यांनी व्यक्त केला. वृत्त निवेदक प्रसन्ना जोशी यांनी देशाने उद्योग तसेच विविध क्षेत्रातल्या प्रगतीत आपला सहभाग, उद्योजकांचे योगदान व सद्यस्थितीत सुरू असलेल्या बदलाबाबत प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला.मराठी पाऊल पडते पुढे या चर्चासत्राला रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

# अखेर केडीएमटीच्या ३४ बसेस भंगारात

## आरटीओच्या लिलावात मिळाले ८३ लाख



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण: कल्याण डोंबिवली महापालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या ताफ्यातील आयुर्मान संपलेल्या ३४ बसेस अखेर भंगारात काढण्यात आल्या आहेत. आरटीओतर्फे काढण्यात आलेल्या या वाहनांच्या लिलाव प्रक्रियेत केडीएमटीला ८३ लाख ९२ हजार ७५८ रुपये इतकी रक्कम प्राप्त झाल्याची माहिती परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापक डॉ. विजयकुमार द्वासे यांनी दिली. परिवहन उपक्र माच्या स्थापनेनंतर सन १९९७ ते २००० या कालावधीत अनेक बसेस दाखल झाल्या. सद्यस्थितीत या बसेसचे ८ ते १० वर्षांचे आयुर्मान संपुष्टात आल्याने शासकीय नियमानुसार त्या गणेशघाट येथील आगारात मागील काही वर्षापासून धूळखात उभ्या होत्या. या बसेसमुळे गणेशघाट आगारातील बहुतांश जागा व्यापली असल्याने नव्या बसेस उभ्या करण्यासही जागा शिल्लक राहिली नव्हती. राज्य शासनाने १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत शासकीय कार्यालयातील स्वच्छता तसेच आयुर्मान संपलेली १५ वर्षे जुनी भंगार वाहने निर्लेखित करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या नियमानुसार, या बसेसचे निर्लेखन करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. जानेवारीमध्ये आयुक्तांनी या प्रक्रियेस मान्यता दिल्यानंतर आरटीओ कार्यालयाच्या निर्देशानुसार, १५ वर्षांपेक्षा जास्त, आयुर्मान संपलेल्या ३४ बसेस तसेच ३ लहान वाहने अशा एकूण ३७ वाहनांचे केंद्र शासनाच्या मुंबईतील मेटल स्क्रैप ट्रेड कॉर्पोरेशन या निर्लेखन कंपनीद्वारे निर्लेखनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली. याअंतर्गत बसेसची लिलाव प्रक्रिया तीन टप्प्यांत ऑनलाइन पद्धतीने पार पाडण्यात आली. यामध्ये २२ जानेवारी ते ३ फेब्रुवारी या कालावधीत इच्छुक खरेदीदारांसाठी या बसेस तपासणी आणि पाहणी करण्यासाठी गणेशघाट आगारात उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. ४ फेब्रुवारीला ही लिलाव प्रक्रिया कार्यान्वित करण्यात आली. लिलाव प्रक्रियेसाठी आरटीओ कार्यालयातर्फे या बसगाड्यांचे ५३ लाख ३८ हजार इतके आधारभूत मूल्य निर्धारित करण्यात आले होते. प्रत्यक्षात लिलाव प्रक्रियेअंती मात्र ८३ लाख ९२ हजार ७५८ रुपये इतकी रक्कम मिळाली.

आगारातील जागा मोकळी झाली मुख्यमंत्री कार्यालयाच्या १०० दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्याअंतर्गत स्वच्छतेच्या मुद्द्यांवर हा उपक्रम राबविण्यात आला असून, या ३७ वाहनांच्या निर्लेखनामुळे आता आगारात पार्किंग आणि बसगाड्यांच्या दुरुस्तीसाठी पुरेशी मोकळी जागा उपलब्ध झाल्याचे व्यवस्थापक डॉ. विजयकुमार द्वासे यांनी सांगितले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | कोर्स | कालावधी |
| --- | --- | --- |
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# ठाणे जिल्ह्यातील १७ हजार ९७५ घरकुल पात्र लाभार्थींना मंजूरी पत्राचे वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : "सर्वांसाठी घरे" या धोरणांतर्गत "प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२" अंतर्गत आज, दि. २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री, भारत सरकार श्री. अमित शहा व मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते राज्यातील २० लाख लाभार्थींना मंजुरी पत्र वितरण, १० लाख लाभार्थ्यांना एका क्लिकमध्ये पहिला हप्ता दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले.

त्यानुषंगाने ठाणे जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत १८ हजार २४८ चे उद्दिष्ट असून यापैकी एकूण १७ हजार ९७५ घरकुल पात्र लाभार्थींना तालुकानिहाय मंजुरी पत्र प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार आज नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हास्तरावर प्रातिनिधीक स्वरूपात १५ लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण करण्यात आले. त्याचबरोबर सर्व पात्र लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण करण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) पहिल्या टप्प्यातील घरकुलाचे काम उत्तम प्रकारे पूर्ण केलेल्या तीन लाभार्थ्यांना घरकुलाच्या चावीची प्रतिकृती देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सहाय्यक आयुक्त (पुनर्वसन) अमोल यादव, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) प्रमोद काळे तसेच या योजनेचे लाभार्थी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यात ठाणे जिल्ह्यातील घरकुलांचे काम उत्तम प्रकारे केले आहे. आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रम सुरू आहे आणि प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये मंजुरी पत्र वितरण कार्यक्रम सुरू आहे. प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे घर असणे महत्त्वाचे आहे. यामुळे लाभार्थ्यांनी दर्जेदार, उत्कृष्ट घरकुल तयार करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच आवश्यक कागदपत्र उपलब्ध करून देण्यासाठी व मयत झालेल्या लाभार्थींच्या कुटुंबासाठी प्रशासनाने तसेच लाभार्थ्यांनी जोमाने काम करावे, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन करताना केले.

घरकुल नोंदणी, मंजुरी यासाठी ठाणे जिल्हा महाराष्ट्रात अग्रेसर आहे. ग्रामस्थांना स्वप्नातील घर पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटीबद्ध आहे. घर मिळवून देण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन तसेच जिल्हा परिषद मार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन ज्या पध्दतीने काम करीत आहे, त्यासाठी लाभार्थ्यांनी देखील घर बांधणी वेळेत पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी याप्रसंगी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे म्हणाले की, घरकुल नोंदणी व मंजुरी करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातील अधिकारी- कर्मचारी यांनी मिशन मोडवर केवळ ७ दिवसात कामकाज पूर्ण केले आहे, यासाठी त्यांनी विभागाचे कौतुक केले. तसेच लाभार्थ्यांनी त्यांना मंजूर झालेली घरे लवकरात लवकर पूर्ण करावीत,अशा शुभेच्छा दिल्या.

ठाणे जिल्हयामध्ये मंजुरी पत्र वितरण व प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम जिल्हास्तर, तालुकास्तर तसेच ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी १७ हजार ९७५ पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरीत व लाभार्थ्यांना पहिला हप्ता एका क्लिकवर वितरीत करण्यात आला आहे.

"स्वप्नातील घर पूर्ण करण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा - २ महत्त्वाची योजना असून आज मला मंजुरी पत्र व पहिला हप्ता देण्यात आला, ही माझ्या कुटुंबियांसाठी आनंदाची बाब आहे."

-अंबरनाथ तालुक्यातील लाभार्थी, अर्चना यशवंत पतंगराव

"माझं कुडाच्या घरात बालपण गेलं आणि लग्नानंतर देखील कुडाच्या घरातच राहत होतो. प्रधानमंत्री आवास योजना टप्पा १ अंतर्गत माझं स्वतःचं घर तयार झालं आहे, यासाठी मी प्रशासनाची आभारी आहे."

- भिवंडी तालुक्यातील लाभार्थी, विद्या उत्तम पाटील

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी संतोष पांडे यांनी उत्तम प्रकारे करून कार्यक्रमाची धुरा सांभाळली.

# महाराष्ट्राबाहेर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा डंका

यावर्षी ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन राजधानी नवी दिल्ली येथे होत आहे. या आधी तब्बल बावीस वेळा महाराष्ट्राबाहेर साहित्य संमेलने झाली आहेत. यंदाही हे संमेलन अनेक कारणांसाठी विशेष ठरणार आहे. केंद्र सरकारकडून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिले साहित्य संमेलन आहे. यामुळे हे संमेलन ऐतिहासिक असेल. हा सोहळा मराठी भाषिक, साहित्यप्रेमींसाठी एक अभिमानास्पद क्षण ठरणार आहे. यामुळे संपूर्ण भारतभर आणि परदेशात विखुरलेल्या मराठी जनामनास एकत्र येण्याची संधी मिळणार आहे. या संमेलनामुळे मराठीचा लौकिक अधिक वृद्धिंगत होईल. विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणारे उद्घाटन हा मराठी भाषिकांसाठी अभिमानाचा क्षण असेल.

**अशी आहे मराठी साहित्य संमेलनाची गौरवशाली परंपरा**

मराठी साहित्य संमेलनाची मुहूर्तमेढ १८७८ मध्ये पुण्यात रोवली गेली. त्यानंतर महाराष्ट्राबाहेर मराठी साहित्याच्या प्रचार-प्रसारासाठी अनेक संमेलने महाराष्ट्राबाहेर पार पडली आहेत. विशेष म्हणजे १८७८ मध्ये सुरू झालेली साहित्य संमेलनाची परंपरा आजही सुरू आहे. पहिले संमेलन १८७८ मध्ये पुणे येथे पार पडले.

- यानंतर १९०९ मध्ये म्हणजेच तब्बल २१ वर्षांनी सातवे संमेलन बडोदा (गुजरात) येथे पार पडले.
- १९१७ मध्ये म्हणजेच तब्बल आठ वर्षांनी दहावे संमेलन मध्यप्रदेश मधील इंदूर येथे पार पडले.
- १९२१ मध्ये तब्बल चार वर्षांनी अकरावे संमेलन बडोदा (गुजरात ) येथे पार पडले.
- १९२८ मध्ये तब्बल सात वर्षांनी चौदावे संमेलन मध्यप्रदेशमधील ग्वाल्हेर येथे पार पडले.
- १९२९ मध्ये पंधरावे संमेलन कर्नाटकमधील बेळगाव येथे पार पडले.
- १९३० मध्ये सोळावे संमेलन गोव्यातील मडगाव येथे पार पडले.
- १९३१ मध्ये सतरावे संमेलन तेलंगणातील हैद्राबाद येथे पार पडले.
- १९३४ मध्ये तब्बल चार वर्षांनी विसावे संमेलन बडोदा (गुजरात) येथे पार पडले.
- १९३५ मध्ये एकविसावे संमेलन मध्यप्रदेशमधील इंदूर येथे पार पडले.
- १९४६ मध्ये तब्बल अकरा वर्षांनी ३० वे संमेलन कर्नाटकमधील बेळगाव येथे पार पडले.
- १९४७ मध्ये ३१ वे संमेलन तेलंगणातील हैद्राबाद येथे पार पडले.
- १९५१ मध्ये तब्बल चार वर्षांनी ३४ वे संमेलन कर्नाटक मधील कारवार येथे पार पडले.
- १९५३ मध्ये ३६ वे संमेलन गुजरातमधील अहमदाबाद येथे पार पडले.
- १९५४ मध्ये ३७ वे संमेलन दिल्ली येथे पार पडले.
- १९६१ मध्ये ४३ वे संमेलन तब्बल सात वर्षांनी मध्यप्रदेशमधील ग्वालेहर येथे पार पडले.
- १९६४ मध्ये ४५ वे संमेलन गोव्यातील मडगाव येथे पार पडले.
- १९६७ मध्ये ४७ वे संमेलन मध्यप्रदेशमधील भोपाळ येथे पार पडले.
- १९८१ मध्ये तब्बल १४ वर्षांनी ५६ वे संमेलन छत्तीसगडमधील रायपूर येथे पार पडले.
- २००० मध्ये ७३ वे संमेलन तब्बल १९ वर्षांनी कर्नाटक मधील बेळगाव येथे पार पडले.
- २००१ मध्ये ७४ वे संमेलन मध्यप्रदेशमधील इंदोर येथे पार पडले.
- २०१५ मध्ये तब्बल १४ वर्षांनी ८८ वे संमेलन पंजाबमधील घुमान येथे पार पडले. त्यानंतर २०१८
- २०१८ मध्ये ९१ वे संमेलन गुजरात मधील बडोदा येथे पार पडले.

यानंतर यंदा तब्बल ७ वर्षांनी पुन्हा २०२५ मध्ये ९८ वे संमेलन महाराष्ट्राबाहेर दिल्ली येथे पार पडणार आहे.

**मराठी भाषा, संस्कृती आणि साहित्याचा जागर**

मराठी ही केवळ एक भाषा नसून शब्द, साहित्य, संगीत, कला आणि संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे. संत साहित्यापासून ते आधुनिक काव्यापर्यंत, लोककथांपासून आधुनिक कादंबऱ्यांपर्यंत, नाटकांपासून चित्रपटांपर्यंत मराठी साहित्याचा वारसा अत्यंत समृद्ध आहे. या संमेलनात मराठी साहित्यविश्वातील मान्यवर लेखक, कवी, समीक्षक आणि रसिक वाचक एकत्र येणार आहेत. विविध चर्चासत्रे, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शने आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांमधून मराठी भाषेचे भवितव्य उजळवण्याचा संकल्प केला जाणार आहे.

**या भव्य सोहळ्याचा भाग बना!**

दिल्लीतील हे साहित्य संमेलन मराठी संस्कृतीचा उत्सव आहे. साहित्यप्रेमी, लेखक, कवी, विद्यार्थी आणि मराठी भाषा जपणाऱ्या सर्वांनी या ऐतिहासिक सोहळ्याचा साक्षीदार होण्याची ही सुवर्णसंधी आहे. आपली मराठी संस्कृती जपण्यासाठी, तिचा जागर करण्यासाठी आणि नव्या पिढीला प्रेरणा देण्यासाठी आपण सर्वांनी या सोहळ्यात सहभागी व्हावे. चला, तर मग मराठी साहित्याचा हा ऐतिहासिक उत्सव दिल्लीच्या ऐतिहासिक भूमीवर भव्य स्वरूपात साजरा करूया!

- वर्षा फडके- आंधळे,
वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)

## ग्रामपंचायत नडगाव-दानबाव मध्ये
# प्रधानमंत्री आवास योजनेचे लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे वाटप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अतगैत सन 2024-25वषौतील मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे वाटप कायैक्रमाचे आयोजन शासनाच्या वतीने पुणे येथे करण्यात आले होते, त्याचे थेट प्रक्षेपण आँनलाईन होते, त्या प्रमाणे नडगाव-दानबाव ग्रामपंचायतीच्या वतीने आँनलाईन कायैक्रम व प्रमाणपत्रे वाटप कायैक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कायौलयात करण्यात आले होते, नडगाव-दानबाव ग्रामपंचायत मध्ये सन 2024-25मध्ये 27 लाभार्थी असून त्यांना घरे मंजूर झाली आहेत, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे देण्यात आली,

यावेळी सरपंच प्रमिला प्रकाश लोणे,उपसरपंच शेवंता जाधव,सदस्य नितीन घरत,कैलास रावते,ग्राँमसेवक प्रसेन गोतारणे, शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे,माजी सरपंच आदेश चौधरी, माजी सरपंच प्रकाश लोणे, पत्रकार तानाजी लोणे,विलास भोईर, यांच्या सह लाभार्थी उपस्थित होते,

# जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन मोठया उत्साहात संपन्न



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शेतकरी व पशुपालक यांनी प्रेरणा घेऊन पशुपालन उद्योग, शेती व्यवसायाबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी व त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जिल्हा परिषद, ठाणे पशुसंवर्धन विभाग अंतर्गत 'जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शन' शुक्रवारी, दि. २१ फेब्रुवारी, २०२५ रोजी आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, बापगाव, भिवंडी येथे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत कांबळे व प्रमुख पाहुणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांच्या हस्ते संपन्न झाला.

जोड व्यवसाय करण्यासाठी पशुपालन करावे तसेच शहरीकरण वाढत असले तरी कमी खर्चात उत्पादन वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या दृष्टिकोनातून पशुपालकांनी पुढाकार घ्यावा, जिल्हास्तरीय प्रदर्शन आयोजित करण्यात आले त्याच पध्दतीने तालुकास्तरीय प्रदर्शन आयोजित करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रदर्शनात चाऱ्याचे बियाणे, तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन या प्रदर्शनात लाभले असून पशूपालकांना महत्त्वाची माहिती मिळणार आहे. २१ वी पशुगणना करण्यासाठी सर्वांनी सहभाग नोंदवावा व राष्ट्रीय पशुधन अभियानामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन पशुपालकांनी जास्तीत जास्त अर्ज करावे, असे आवाहन प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रशांत कांबळे यांनी केले.

या प्रदर्शनात अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पशुपालन एक व्यवसाय म्हणून त्याकडे पहा, कारण कमी गुंतवणुक करुन उत्पन्न मिळवू शकतो. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भाग शहरालगत असल्याने बाजारपेठ उपलब्ध आहेत, त्यामुळे व्यवसायाच्या दृष्टिकोनातून पशुपालन करावे.

शेती व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्यांने जोड व्यवसाय म्हणून पशुपालन करावे. जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनात जात निहाय पशुधन १०० तर इतर १५ स्टॉल आहेत. येथे तज्ञांच्या तसेच पशुपालकांचे अनुभव मोलाचे आहेत, असे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. वल्लभ जोशी यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

जिल्हा परिषद, ठाणे पशुसंवर्धन विभागांतर्गत विविध योजना राबविल्या जातात. तर सेस फंड अंतर्गत देखील पशुपालकांच्या उत्पादनात वाढ होण्यासाठी महत्त्वाच्या योजना राबविल्या आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन यशस्वी उद्योजक योण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समिर तोडणकर यांनी प्रास्ताविक करताना मार्गदर्शन केले.

ठाणे जिल्ह्यातील पशुपालकांनी जिल्हास्तरीय पशुपक्षी प्रदर्शनास सहभागी होऊन पशुपालन व्यवसायाच्या दृष्टीने विचार करत पुढाकार घ्यावा, यासाठी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक रोहन घुगे यांनी प्रदर्शनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी देखील प्रदर्शनास भेट देऊन पशुपालकांना मार्गदर्शन केले. तसेच आदर्श गुणवंत अधिकारी-कर्मचारी सन्मान व आदर्श पशुपालकांचा सन्मान मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

मुऱ्हा, जाफराबादी, डांगी, गीर, खिल्लार, पुंगलुरू, मारवाड, सीजत, शेळी, काठीयावाडी, फायटर, जर्सी कॉस, राजहंस, ससे, बदक, कोबंडी, गिरीराज/ कडकनाथ इत्यादी सर्व प्रकारचे जनावरांच्या जातीचे पशुपक्षी या प्रदर्शनात पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आले होते. तर पशुसंवर्धन विभाग अंतर्गत माहिती घडी पत्रिकेचे उद्घाटन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य कृष्णा वाकडे, जिल्हा परिषदे माजी सभापती संजय निमसे, सामाजिक कार्यकर्ते व जेष्ठ पत्रकार बबन हरणे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती किशोर जाधव, सरपंच भारती बाळाराम गोडे, उपसरपंच बाळाराम गोडे, सर्व पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, शेतकरी, पशुपालक, ग्रामस्थ, आरोग्य यंत्रणा तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रदर्शनात पशुधनांचे स्टॉल ६०, इतर स्टॉल १५ असे एकूण ७५ स्टॉल लावण्यात आले होते. प्रदर्शनात जात निहाय पशुधन १००, पक्षी ६० पाहण्यासाठी उपलब्ध होते. कल्याण डोंबिवली महापालिकेच्या मदतीने शौचालय (मोबाईल टॉयलेट), अग्निशामक पथक, आरोग्य विभागामार्फत आरोग्य यंत्रणा, ग्रामपंचायत विभागामार्फत सफाई कामगारांमार्फत सफाई व्यवस्था उत्तमप्रकारे करण्यात आली होती. सरपंच भारती बाळाराम गोडे, उपसरपंच बाळाराम गोडे यांच्या विशेष प्रयत्नाने कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य लाभले आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वैद्यकिय अधिकारी डॉ. तरुलता धानके, पशुधन पर्यवेक्षक परमेश्वर पोटे यांनी केले. पशुधन विकास अधिकारी धनंजय माजळे यांनी आभार व्यक्त केले.




# तळोजातील नागरिक प्रदूषणाने त्रस्त

पनवेल : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळातील काही अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे तळोजातील नागरिक प्रदूषणामुळे हैराण झाल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. वारंवार तक्रारी करुनही प्रदूषणाची समस्या सुटू शकलेली नाही. या पार्श्वभूमीवर इंडियन नॅशनल परिवर्तन पार्टीने राज्य आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना येथून हटविण्याची मागणी केली आहे. तळोजा औद्योगिक परिसरातील वायू व जल प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस तीव्र होत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (एमपीसीबी) आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) या दोन्ही मंडळांकडे नागरिकांनी वारंवार लेखी व तोंडी तक्रार करुनही मंडळांच्या अधिकाऱ्यांकडून ठोस कारवाई केली जात नसल्याने नागरिक त्रस्त असल्याचा आरोप इंडियन नॅशनल परिवर्तन पार्टीचे राजीव सिन्हा यांनी केला आहे.

# सर्वसामान्यांच्या भाषेला सामावून घेतल्यास मराठीला अधिक समृद्धी

## - डॉ.तारा भवाळकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला हे अभिमानास्पद असून मराठीचा वापर- व्यवहार सर्व स्तरांत व सर्वदूर वाढला पाहिजे. प्रमाण लेखनाइतकीच बोलीभाषाही महत्वाची आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसांच्या भाषेला सामावून घेतले तरच आपली भाषा अधिकाधिक समृद्ध होईल, असे प्रतिपादन 98 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी आज येथे केले.

नवी दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियम मध्ये उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाच्या दुसऱ्या सत्रात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाला माजी केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे, संमेलनाचे स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार, मावळते अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे, कार्यवाह डॉ. उज्वला मेहेंदळे , कोषाध्यक्ष प्रकाश पागे, संमेलनाचे निमंत्रक संजय नहार आदी उपस्थित होते.

डॉ.भवाळकर म्हणाल्या, मराठी भाषेची संमेलने आयोजित करतांना. मराठी लिहिणारी, बोलणारी, मराठीत व्यवहार करणरी माणसे वाढणे आणि ग्रामीण आणि सीमावर्ती भागात मराठी भाषेला पुढे नेण्याचे प्रयत्न करणाऱ्या लेखक, कवी, प्रकाशकांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, मराठी भाषा शिक्षणातून कमी होत चालली आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी दहावीपर्यंतचे शिक्षण मराठीतूनच व्हावे. इंग्रजी माध्यमातून मराठीचे शिक्षण देतांना उच्च मराठीची पुस्तकेच शिकवावी. मराठी भाषेचा विस्तार होण्यासाठी सर्वांनी कृतीशील होण्याची आणि तिला वैश्विकतेकडे नेतांना आपणही विशालतेच्या भावनेने समावेशकतेचे सूत्र स्विकारण्याची आवश्यकता आहे, असे त्यांनी सांगितले.

साहित्य संमेलन सुरू झाल्यानंतर ते विशिष्ट वर्गाचे संमेलन असल्याचे नमूद करून त्या म्हणाल्या, आज संमेलनाची व्याप्ती विस्तारते आहे. मराठी भाषेचा विकासात शिक्षण न घेतलेल्या, परंपरेने शहाणपण आलेल्यांनीदेखील महत्वाचे योगदान दिले आहे. साक्षरतेच्या जोडीला शहाणपण नसेल तर साक्षरतेचा उपयोग नाही. पुस्तकापेक्षा संत कवींनी, पारंपरिक शिक्षण न घेतलेल्या महिला कवयित्रींनी जास्त ज्ञान दिले आहे.

भाषा समाजातील सर्व परंपरा, लोकव्यवहार आणि विचारांची वाहक असते. लोककलेत नृत्य, गाणी, नाट्य, संगीत, कला, वाद्य, कथा असते, एखादी देवता यांच्याशी लोककला जोडलेली असते. जीवनाचं समग्र आकलन लोककलेसोबत प्रत्यक्ष लोकजीवनात असतं. लोकजीवनातील सर्व साधनं मिळून लोकसाहित्य बनते. लोकसाहित्यात या सगळ्याचा अविष्कार होतांना दिसतो.लोककलेतील गीतांचा उपयोग सामाजिक चळवळींसाठी मोठ्या प्रमाणात झाला. स्वातंत्र्यपूर्व काळात जात्यावरची ओवी गाणारी स्त्री राजकीयदृष्ट्याही जागरूक होती. भोवतालच्या वातावरणातून आलेलं शहाणपण हे लोकपरंपरेतून मोठ्या प्रमाणात होतं, म्हणून कामगार चळवळीतून आलेली मंडळी मोठ्या प्रमाणात लेखक-कवी झाले. त्यातून लोकसंस्कृतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. लोकसंस्कृतीत आदीम काळापासून आजपर्यंतचा प्रवाह दिसतो.

डॉ.शोभणे म्हणाले, मराठी भाषेचा प्रवास गेल्या अडीच हजार वर्षापासून अव्याहतपणे सुरू आहे आणि पुढेही असाच जोमाने सुरू राहणार आहे. बृहन्महाराष्ट्रातील विविध साहित्य संस्था मराठी भाषेच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. या साहित्य संस्थांमध्ये वावरणारी नवी पिढीदेखील आस्थेने काम करीत आहे. अशा साहित्यिक संस्थांना शासनाकडून आर्थिक पाठबळ मिळाल्यास या प्रयत्नांना बळ मिळेल. नव्या मंडळीच्या मनात साहित्याविषयी गोडी निर्माण करण्याचे कार्य जुन्या मंडळींनी करणे आवश्यक आहे. या संदर्भात शासनाची भूमिका अत्यंत सकारात्मक आहे. मराठी भाषा विभागाची स्थापना करून त्या माध्यमातून मराठीच्या विकासाचे चांगले कार्य करण्यात येत आहे. विश्व संमेलनाच्या निमित्ताने जगातील मराठी माणसांना एकत्र आणण्याचे कार्य झाले असल्याचे सांगून त्यांनी राज्य शासनाला धन्यवाद दिले.अध्यक्षपदाची सूत्रे नूतन अध्यक्षांकडे सोपवितांना कृतार्थतेची भावना असल्याचे नमूद करून डॉ.शोभणे म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे संमेलन असल्याने त्याला महत्व आहे, हा योग अतिशय महत्वाचा आहे. आजच्या मराठी साहित्य विश्वाला तर्कनिष्ठ आणि वैज्ञानीक दृष्टी देणारे साहित्यिक म्हणून तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या अध्यक्षतेखाली 1954 मध्ये दिल्लीत साहित्य संमेलन झाले होते. त्याच पायवाटेवरून पुढे जाणाऱ्या आणि संशोधनाच्या क्षेत्रात आपला ठसा उमटविणाऱ्या डॉ.तारा भवाळकर अध्यक्ष झाल्या आहेत. साहित्य संमेलनाच्या माध्यमातून सकारात्मक ऊर्जा देण्याचे आणि त्यासाठी पायवाट निर्माण करण्याचे कार्य होते, असे डॉ.शोभणे म्हणाले.

यावेळी 97 व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे यांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची सूत्रे डॉ.भवाळकर यांच्याकडे सोपविले. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे वार्षिक 'अक्षरयात्रा-मराठी साहित्यिकांचे समाजभान' चे प्रकाशन डॉ.भवाळकर यांच्या हस्ते करण्यात आले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# गुलाबराव पाटील शिव कल्याण पुरस्काराने सन्मानित



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती तर्फे यंदाही कल्याण पूर्वेत शिवजयंती निमित्त भव्य शिव प्रेरणा यात्रा काढण्यात आली समितीच्या वतीने दरवर्षी शिवजयंतीच्या निमित्ताने शिवकल्याण पुरस्कार दिला जातो. यावर्षीचा शिवकल्याण पुरस्कार विविध उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण देणारे , कोरोनाच्या काळात शिक्षकांकडून आर्थिक मदत मिळवून दिव्यांग व्यक्तींना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करून समाज उपयोगी काम करणारे सम्राट अशोक विद्यालयाचे उपक्रमशील मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांना आमदार सुलभा गायकवाड,पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, विश्वस्त भगवान भोईर, नरेंद्र सूर्यवंशी शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षा वंदना मोरे, माजी अध्यक्ष राजेश अंकुश, कृषी समितीचे सभापती दत्ता गायकवाड असे अनेक मान्यवरांच्या हस्ते शिव कल्याण पुरस्कार देऊन गुलाबराव पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यापूर्वी देखील गुलाबराव पाटील यांचा विविध सामाजिक संस्था तसेच महाराष्ट्र शासनाकडून राज्याचा शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. गुलाबराव पाटील हे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद कोकण विभागाचे अध्यक्ष असून शिक्षकांच्या न्याय हक्कासाठी लढत असतात. परिषदेचे कोकण विभागाचे कार्यवाह लक्ष्मण बालगुडे, राज्याचे उपाध्यक्ष एकनाथ दळवी व राज्याध्यक्ष वेणूनाथ कडू यांनी पाटील यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## संक्षिप्त

# अमंली पदार्थ विक्रीसाठी बाळगल्या प्रकरणी एकाला अटक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणातील महात्मा फुले पोलीस स्टेशन च्या हद्दीत बैलबजार चौक परिसरातून एमडी मादक अमंली पदार्थ विक्रीसाठी जवळ बाळगल्या प्रकरणी परिमंडळ 3 अमली पदार्थ विरुद्ध कारवाई करण्याकरिता नियुक्त विशेष पथकाने कारवाई करीत एकाला अटक केली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन हद्दीत बैलबाजार चौक येथील परिसरात माताफ अनिस रईस वय 33 वर्ष रा. रूम न 10 जुना मच्छी मार्केट गोल्डन प्लाझा बिल्डिंग कल्याण पश्चिम याच्याकडे 7 ग्रॅम md हा अंमली पदार्थ विक्री करिता जवळ बाळगलेला मिळून आल्याने या इसमावर NDPS Act सेक्शन 8(c)20(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ६५ इमारती पाडण्यास शिवसेना ठाकरे गटाचा ठाम विरोध

## नागरिकांना न्याय मिळण्यासाठी काढणार जनआंदोलनात्मक मोर्चा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अन्यायकारक निर्णयाविरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे संघटना ठामपणे उभी आहे. रहिवाशांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असून, महानगरपालिका आयुक्त आणि पोलीस उपायुक्त यांची भेट घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या लढ्याचा पुढील टप्पा म्हणून शनिवारी हेरिटेज हॉल येथे बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत उच्च न्यायालयाच्या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात स्थगिती मिळवण्यासाठी कायदेशीर मार्गांवर चर्चा करण्यात आली. तसेच तज्ज्ञ वकिलांसोबत सल्लामसलत करून पुढील रणनीती ठरवण्यात आली.

या बैठकीला शिवसेना कल्याण जिल्हा संघटक तात्या माने, महिला जिल्हा संघटिका वैशाली दरेकर, शिवसेना शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे, अभिजीत सावंत, विभाग प्रमुख प्रमोद कांबळे, राजेश सावंत, संजय पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे भाऊ पाटील, काँग्रेस पक्षाचे अजय पोळकर, कम्युनिस्ट पक्षाचे काळू कोमस्कर तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत ॲड. निलेश जाधव, ॲड. गायकवाड, ॲड. निलेश पांडे यांच्यासह वास्तुविशारद आणि याचिकाकर्ते संदीप पाटील उपस्थित होते. त्यांनी रहिवाशांना प्रकरणाची गांभीर्यता समजावून सांगत, कायदेशीर बाबी स्पष्ट केल्या आणि पुढील लढ्यासाठी मार्गदर्शन केले.

संदीप पाटील यांनी स्पष्ट केले की, "माझा लढा प्रशासनाच्या चुकीच्या पद्धतीविरुद्ध आहे, नागरिकांविरुद्ध नाही." तसेच यापुढे नागरिकांना शक्य तेवढे सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. २०१७ पासून हे प्रकरण हाताळत असल्याचे सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, महाराष्ट्र सरकारच्या रेरा कायद्यातील त्रुटी उघडकीस आणण्यासाठी त्यांनी याचिका दाखल केली होती आणि उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०२२ मध्ये दोन वेळा विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले. याच मुद्द्यावर पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, या प्रकरणांमध्ये तत्कालीन आयुक्त, उपायुक्त आणि वॉर्ड ऑफिसर यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी आणि त्यांना सहआरोपी म्हणून नामांकित करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

बैठकीत ॲड. निलेश जाधव, ॲड. निलेश पांडे आणि ॲड. गायकवाड यांनी स्पष्ट केले की शासन त्यांच्या अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी प्रयत्न करणार आहे, त्यामुळे नागरिकांनी स्वतःचा लढा अधिक बळकट करणे आवश्यक आहे. वकिलांनी नागरिकांसमोर दोन पर्याय मांडले— पहिला पर्याय म्हणजे इमारतींची नियमितता मिळवण्यासाठी प्रयत्न करणे, तर दुसरा पर्याय म्हणजे न्यायालयामार्फत याचिका करून बिल्डरकडून व्याजासह मोबदला मिळवणे. तसेच बिल्डरांविरुद्ध फसवणुकीचे गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्याची संधीही उपलब्ध असल्याचे त्यांनी नागरिकांना समजावून सांगितले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे संघटनेतर्फे लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन या प्रकरणाची गांभीर्यता लक्षात आणून दिली जाईल. त्याचप्रमाणे, भारतीय जनता पार्टीचे ठाणे जिल्ह्याचे संपर्क नेते यांच्या ठाणे येथे होणाऱ्या जनता दरबारात देखील या विषयावर न्याय मागितला जाईल. जर तरीही योग्य न्याय मिळाला नाही, तर सर्व रहिवाशांना सोबत घेऊन मोठा जनआंदोलनात्मक मोर्चा काढण्यात येईल, असे बैठकीत सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी ठामपणे सांगितले.

# ठाणे शहरात २४ फेब्रुवारी रोजी वन मंत्री गणेश नाईक यांचा 'जनता दरबार'




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : वन मंत्री श्री.गणेश नाईक हे सोमवार, दि. 24 फेब्रुवारी, 2025 रोजी सकाळी 11.00 वा. रघुवंशी हॉल, 8, खारकर आळी रोड, जांभळी नाका, ठाणे (पश्चिम) येथे ठाणे जिल्हयातील नागरिकांच्या विविध समस्या समजून घेण्यासाठी व जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी "जनता दरबार" घेणार आहेत. यावेळी विविध शासकीय विभागांचे अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

## काकडपाडा येथे

# शेतीशाळेचा पाचवा वर्ग



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण: वासिद जवळील काकडपाडा येथे नुकताच बाळाराम चौधरी यांच्या शेतावर शेती शाळेचा पाचवा वर्ग आयोजित करण्यात आला. सदर वर्गामध्ये शाळेसाठी निवड करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना किड व रोग नियंत्रणासाठी निम अर्क चा वापर कशा प्रकारे करावा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.तसेच त्या नंतर प्रात्यक्षिक प्लॉट ला भेट देवून पीक प्रात्यक्षिक किट मधील चिकट सापळे ( स्टिकी ट्रॅप) वापर कसा करावा व त्यांची माहिती तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक वैशाली भापसे व कृषी सहाय्यक ,गेरसे प्रसाद भोकरे यांनी दिली. सदर शेतीशाळा वर्गाचे आयोजन मा.रामेश्वर पाचे, मा.प्रकल्प संचालक आत्मा तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी,ठाणे व कुमार जाधव,तालुका कृषी अधिकारी, कल्याण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले .शेतीशाळा वर्गासाठी प्रगतिशील शेतकरी सीताराम चौधरी,गंगाराम चौधरी,बाळाराम चौधरी व नानू चौधरी,राजाराम चौधरी उपस्थित होते.अशा प्रकारे उपस्थितांचे आभार मानून शेतीशाळा वर्ग संपन्न झाला.

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने

# गड संवर्धन व अभ्यास मोहीम






दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामिण : मावळा प्रतिष्ठान या प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्ताने गड संवर्धन व अभ्यास मोहीम राबविण्यात आली.

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील अवचित गड, घोसाळगड, तळगड व बिरवाडी किल्ला अशा चार किल्ल्यांवर ही यशस्वी मोहीम पार पाडली. दोन दिवसीय मोहिमेत प्रतिष्ठानच्या एकूण नऊ सदस्यांनी सहभाग घेतला होता. या मोहिमेत प्रामुख्याने गडाच्या मार्गावर मार्गदर्शक पाट्या लावून गडावर असलेल्या प्लॅस्टिक बॉटल व कचरा जमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली. तसेच प्रत्येक गडाचा ऐतिहासिक अभ्यास करण्यात आला.

यामध्ये प्रतिष्ठानचे अध्यक्ष भरत भोईर, सदस्य अरुण जामदार, भूषण भोईर, गौतम तरे, सचिन पाटील, नरेन जरे, निखिल भोईर, सुधीर भोईर, निराकार भोई आदी सदस्यांचा सहभाग होता. प्रत्येक वर्षी अशाच पद्धतीने गड किल्ल्यांवर जाऊन महाराजांची जयंती साजरा करणार असल्याचा मानस असून यातच जयंती उत्सवाचा आनंद आहे असे प्रतिष्ठानचे सदस्य अरुण जामदार यांनी म्हटले.


# आरोग्य तज्ञ डॉ.विजय दहिफळे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राज्य शासन व व्हाईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र भूषण व पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड सोहळा दिनांक 23 फेब्रुवारी 2025 रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेला आहे. यामध्ये सोहळयामध्ये प्रसिद्ध विचारवंत व आरोग्य तज्ञ डॉ. विजय दहिफळे यांचे आरोग्य क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना व्हाईस ऑफ इंडिया महाराष्ट्र भूषण पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते दिला जाणार आहे.महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाल्यामुळे डॉक्टर दहिफळे यांचे आरोग्य क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांच्या वतीने अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# ठाण्यातील बाळकुम परिसरात पंधरा तास वीज पुरवठा ठप्प



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे शहरातील बाळकुम पाडा नं २ या भागासह आसपासच्या परिसरात शुक्रवार रात्री १० वाजल्यापासून रोहित्र बिघाड झाल्यामुळे वीज पुरवठा बंद आहे. हा बंद वीज पुरवठा सुरू करण्याचे महावितरण अभियंत्यांचे रात्रीपासून प्रयत्न सुरू आहेत. परंतु, १५ तास उलटुनही वीज पुरवठा सुरू झालेला नाही. यामुळे नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. तसेच अनेकांच्या व्यवसायांवर परिणाम झाला आहे.

ठाण्यातील बाळकुम परिसरात शुक्रवारी रात्री १० वाजता वीज वाहिनीत बिघाड झाला. या बिघाडाचा फटका बाळकुम पाडा नंबर दोनसह आसपासच्या परिसराला बसला. महावितरणचे सहकारी रात्रीपासून बिघाड शोधून वीज पुरवठा सुरळीत करत आहेत. परंतु रोहित्र बिघाड झाल्याने वीज पुरवठा सुरळीत होण्यासाठी या भागात नवीन रोहित्र बसविण्याचा निर्णय महावितरणाच्या वतीने घेण्यात आला आहे. हे काम रात्री दहा वाजल्यापासून सुरू असले तरी अद्याप वीज पुरवठा सुरळीत झालेला नाही. वीजपुरवठा बंद असल्याने परिसरातील रहिवासी अंधारात असून, घरगुती कामांपासून ते व्यावसायिक व्यवहारांवर परिणाम झाला आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांसाठी ही परिस्थिती अधिक त्रासदायक ठरत आहे. त्यात गेल्या काही दिवसांपासून ठाण्याचे तापमान हे वाढल्याचे दिसून येत आहे. या वाढत्या तापमानामुळे उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. ठाण्यात अनेक नोकरदार विदेशातील कंपन्या, बँका आणि इतर कार्यालयांमध्ये भारतात राहून कामे करतात. असे नोकरदार ठाणे शहरात अधिक संख्येने आहेत. मात्र, वीजपुरवठा बंद झाल्याने त्यांच्या कामावर परिणाम झाला आहे. महावितरणकडून तांत्रिक पथकाला कामाला लावण्यात आले आहे. मात्र, रात्री उशिरापर्यंत वीजपुरवठा पूर्ववत करण्यास यश आलेले नाही. प्रशासनाने लवकरात लवकर हा बिघाड दुरुस्त करून वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना १९ व्या हफ्ता २४ फेब्रुवारीला मिळणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : पी.एम. किसान योजनेंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि.24 फेब्रुवारी 2025 रोजी दु.2.00 ते 3.00 या वेळेत 19 व्या हफ्त्याचे वितरण करण्यात येणार आहे. बिहार राज्यातील भागलपूर येथे किसान सन्मान समारोह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या ऑनलाईन समारंभामध्ये सर्व खासदार व आमदार उपस्थित राहणार आहेत. प्रगतीशील शेतकरी, कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभाग यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यात येणार आहे. मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्री महोदयांनीही या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

तरी या कार्यक्रमात जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी देखील सहभागी व्हावे, असे आवाहन कोकण विभाग, ठाणे विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी केले आहे.

# सलमान डोलारेचा आणखीन एक प्रताप उघडकीस

## महात्मा फुले पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कुख्यात बिल्डर सलमान डोलारे याचा आणखीन एक कारनामा समोर आला आहे. या प्रकरणात कल्याणच्या तलाठयाची बनावट सही आणि बनावट शिक्का मारला आहे. त्याचा वापर जमीन मोजणी आणि मिळकत पत्रिकेवर नाव नोंदविण्यासाठी केला आहे. अशा प्रकारे तलाठी आणि शासनाची फसवणूक केल्याची बाब उघडकीस आली आहे.या प्रकरणी तलाठी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार महात्मा फुले पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. धक्कादायक म्हणजे डोलारे याच्या विरोधात यापूर्वीही फसवणूकीचे गुन्हे दाखल झाले आहे. तो फरार आहे. पोलिसांना तो का सापडत नाही. हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. कल्याणमध्ये युसूफ हाईट ही बेकायदा इमारत उभारल्या प्रकरणी बिल्डर डोलारे याच्या विरोधात गुन्हा दाखल आहे. त्याचबरोबर अन्य एका इमारतीचे आणि बंगल्याचे बेकायदा बांधकाम केल्याची बाबही उघड झाली होती. या प्रकरणातही पोलिस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल आहे. तसेच एका जागे प्रकरणात त्याने एकाची फसवणूक केली होती. फसवणूक प्रकरणात विविध गुन्हे दाखल असताना आत्ता डोलारे यांनी तलाठ्याची बनावट सही करुन त्यावर तलाठ्याचा बनावट शिक्का मारला आहे. त्यावर तारीखही टाकली आहे.

या प्रकरणी कल्याणचे तलाठी जर्नादन सूर्यवंशी यांनी महात्मा फुले पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीत सूर्यवंशी यांनी म्हटले आहे की, कल्याणमध्ये एका जागा मूळ मालक सुनिता वैद्य यांनी विकसीत करण्यासाठी घेतली. त्या जागेच्य विकास कामात बिल्डर डोलारे हे भागीदार आहेत. या जागेचा सातबारा आणि हा हस्तलिखित स्वरुपात आहे. या सातबाराची संगणकीय प्रत डोलारे यांनी काढली होती. त्यावर तलाठी सूर्यवंशी यांची बनावट सही केली. तसेच तलाठीचा बनावट शिक्का मारला आहे. त्याच्या बाजूला ३१ जुलै २०१५ अशी तारीख टाकली आहे. हा उतारा एकट्या डोलारे याच्या नावाचा असून त्याने त्याचा वापर जमीन मोजणी आणि मिळकत पत्रिकेवर नाव नोंदविण्यासाठी केला असल्याचे दिसून येत आहे. अशा प्रकारे तलाठी सूर्यवंशी यांच्यासह शासनाची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. तलाठी सूर्यवंशी यांनी ही बाब कल्याणच्या तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिल्यावर त्यांच्या आदेशानुसार सूर्यवंशी यांनी महात्मा फुले पोलिस ठाणे गाठले. पोलिसांनी सलमान डोलारे याच्या विरोधात फसवणूकीचा गुन्हा दाखल केला आहे. सलमान डोलारे विरोधात शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी अनेक गुन्हे दाखल आहेत परंतु तो पोलिसांना का सापडत नाही हा मोठा सवाल आता उपस्थित राहिला आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024